**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1187/2007.**

श्री माणिक चिंतामण गवारगुरु
मु. खाकटा पो. पंचगव्हान
ता. तेल्हारा जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अकोला.
2) अ) जन माहिती अधिकारी तथा
सचिव, गट ग्रामपंचायत उमरी (खाकटा)
ता. तेल्हारा जि. अकोला
ब) जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती तेल्हारा
ता. तेल्हारा जि. अकोला ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.4.2006 (कार्यालयात प्राप्त 27.4.2006) रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, गट ग्रामपंचायत उमरी (खाकटा) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली होती.

मौजे खाकरा येथिल यशवंत ग्रामवृध्दी योजने अंतर्गत समाज मंदिराच्या बंद पडलेल्या कामाच्या विषयी गावक–यानी दिलेल्या तक्रारीच्या अहवालाच्या प्रती मिळण्याबाबत व जमा खर्चाच्या नोंदीबाबत. माहितीचा कालावधी 2002 व 2003 ते 2005 व 2006 पर्यंत. मौजे खाकरा येथिल यशवंत ग्रामवृध्दी योजने अंतर्गत समाज मंदिराचे आजपर्यंत जमा खर्चाच्या प्रत्येक तारखेच्या व रकमेच्या वैयक्तीक नोंदीची माहिती (2) सदरच्या कामाचे मुल्यांकन झालेल्या तारखेत (3) आजमीतीस असलेले बांधकामाचे मुल्यांकन (4) संबंधीत कामावीषयी गावक–यानी लोकशाही दिनी दिलेल्या तक्रारीचे आपण वरिष्ठांना पाठविलेल्या सर्व अहवालाच्या प्रती (5) ग्रा.वि.अधिकारी यांनी सचिवाला दिलेल्या अजपर्यंतच्या नोटिसच्या प्रती (6) सचिवाने ग्रा.वि.अधिकारी यांना दिलेल्या अजपर्यंतच्या माहीतीच्या प्रती.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी पुन्हा माहिती अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी पंचायत समिती तेल्हारा यांचेकडे तीच माहिती दि. 20.2.2006 रोजी मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि. 29.5.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 27.4.2006 रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली नाही याकरीता तत्कालीन ग्रामसेवक यांनी मानसीक स्थिती ठिक नव्हती असा खुलासा दिलेला आहे. ते स्वतः हजर आहेत व सद्या ते शासकीय सेवेत कामावर येत नाही असे त्यांनी सांगितले व त्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे असे गट विकास अधिकारी यांनी सांगितले. दि. 20.2.2006 रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे जो अर्ज केलेला दिसून येतो त्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती ही

ग्रामपंचायत सचिव स्तरावर असल्यामुळे श्री चिकटे सचिव ग्रामपंचायत यांना कारणे दाखवा नोटिस दि. 27.3.2006 रोजी दिलेली दिसून येते व सदरची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यानंतर पुन्हा दि. 22.6.2006 रोजी श्री चिकटे सचिव ग्रामपंचायत यांना दि. 22.8.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दि. 29.5.2006 रोजी जे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते त्या संदर्भात पुन्हा दि. 3.6.2006 रोजी आपण अर्जात नमुद केलेली माहिती पंचायत समिती तेल्हारा यांचेकडील असून पंचायत समिती स्तरावर शासनाचे निर्देशानुसार माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केलेल्या आहेत असे कळविलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही त्याकरीता गट विकास अधिकारी पंचायत समिती तेल्हारा यांनी खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशामध्ये श्री माणीक चिंतामण गवारगुरु रा. खाकटा यांनी पंचायत समितीला दिनांक 20.2.2006 रोजी माहिती मागितली होती. अर्जामधील काही माहिती सचिव ग्रामपंचायत उमरी यांचे संबंधीत असल्याने सचिव ग्रामपंचायत उमरी यांना पत्र कमांक 221 दि. 24.2.2006 त्वरीत माहिती देण्याबाबत कळविले.

पंचायत समिती संदर्भात मुल्यांकनाबाबत

<u>मुद्या कमांक 2 – सदरच्या कामाचे मुल्यांकन झालेल्या कामाच्या तारखेत</u>

याबाबत मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे पत्र कमांक 1211 दि. 22.12.2005 नुसार रु. 2,03,800/– एवढे मुल्यांकन असल्याबाबत लेखी पत्र दिले.

<u>मुद्या कमांक 2 – आज मितीस असलेल्या बांधकामाचे मुल्यांकन</u>

याबाबत या कार्यालयाचे पत्र कमांक 307 दि. 27.3.2006 नुसार अर्जदारास लेखी कळविले आहे व अर्जदाराची माहिती मिळाल्याबाबत स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. तसेच ग्राम पंचायत संबंधीत माहिती ग्राम पंचायतीकडुन घेण्याबाबत व तसा अर्ज करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार अर्जदाराने दि. 27.4.2006 ला ग्राम पंचायतीकडे

अर्ज केला परंतु सचिव श्री चिकटे यांनी अर्जदारास माहिती दिली नाही. त्यामुळे अर्जदाराने दि. 29.5.2006 ला मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अकोला यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पत्र क्र. 922 दि. 23.6.2006 नुसार अर्जदारास राज्य माहिती आयोगाकडे 90 दिवसाचे आत दुसरी अपील करता येईल याबाबत लेखी कळविले परंतु अर्जदाराने 90 दिवसाचा कालावधी संपल्यानंतर तब्बल 148 दिवसांनी आपणाकडे दुसरे अपील केले आहे. त्यामुळे सदरहु अपील ग्राहय धरता येवू नये.

तसेच अपील अर्जामध्ये फक्त दोनच मुद्याबाबत उल्लेख केलेला आहे.

1. माहिती अधिकारी अंतर्गत दि. 27.4.2006 ला माहिती मागितली. सदरहु मुद्या हा ग्रामपंचायतीशी संबंधीत आहे.
2. दि. 29.5.2006 ला त्यावर अपील केली तरीही माहिती मिळाली नाही.

अपील मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे केली होती यावर मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पत्र क्र. 922 दि. 3.6.2006 नुसार पंचायत समितीला पत्र दिले त्यावर पंचायत समितीने पत्र क्र. 978 दि. 22.8.2006 नुसार श्री पी.आर.चिकटे ग्राम पंचायत सचिव उमरी यांना लेखी पत्र दिले त्यावर सुध्दा श्री चिकटे यांनी अर्जदारास माहिती दिली नाही. याबाबत श्री चिकटे हे सर्वस्वी जबाबदार आहेत.

हया प्रकरणात मी दिरंगाई केली नसुन या बाबीस मी जबाबदार नाही त्यामुळे माझेवर केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 20 खाली शास्ती लावण्यात येवू नये हि विनंती.

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की सदरची माहिती ही ग्रामपंचायत स्तरावर असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन न देण्यास श्री चिकटे हे सर्वस्वी जबाबदार दिसून येतात. श्री चिकटे हे आज हजर आहेत व त्यांनी खुलासा दाखल केलेले आहे तो खालीलप्रमाणे

अपीलकर्त्याने माहिती संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार दाखल केलेल्या अपीलासंबंधी माहितीचे संदर्भात श्री पी.आर.चिकटे तत्कालीन सचिव ग्राम पंचायत उमरी (खाकटा) सविनय खुलासा सादर करतो तो येणेप्रमाणे :–

1. ''अपीलकर्त्याने माहिती करीता दि. 10.4.2006 अन्वये दिलेला अर्ज माझेकडे दिनांक 27.4.2006 ला प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याचे अर्जातील एकुण सहा मुद्याचे माहिती पैकी मुद्या क्र. 1 ते ची माहिती सचिव गट ग्रामपंचायत उमरी यांचे संबंधीत होती.

2. अपीलकर्त्याने सदर माहिती करिता अर्ज दाखल केल्यानंतर तक्रारीनुसार उपआयुक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अकोला यांचे पत्र क्र. 1163 दि.20.7.2006 नुसार गट विकास अधिकारी पं.स.तेल्हारा यांनी दि. 22.12.2006 ला चौकशी केली होती. तेव्हा चौकशीला गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत कनिष्ठ अभियंता व स्वतः अपीलकर्ता उपस्थित होते. चौकशीचे वेळी अपीलकर्ता यांनी माझेकडे उपलब्ध असलेले मुद्या क्र. 1 संबंधीत माहिती तपासणी करिता उपलब्ध करुन दिली होती व त्यांना आवश्यकता वाटल्यास बॅंक खाते पुस्तिकेच्या झेरॉक्स प्रति किंवा नोंदीची माहिती पुरविण्यात येईल असे सांगितले होते. परंतु तेव्हा अपिलकर्त्याने बॅंक पासबुक स्वतः चौकशीचे वेळी तपासुन पाहिल्यावर त्यानंतर माहिती आवश्यक आहे किंवा नाही याबाबत कळविले नाही. चौकशीचे वेळी गट विकास अधिकारी यांचे निर्देशानुसार विस्तार अधिकारी पंचायत यांनी यशवंत ग्राम समृध्दी योजना संबंधीत बॅंक खाते पुस्तक व इतर रेर्कार्ड तपासणी करिता ताब्यात घेतले. त्यानंतर अपिलकर्त्याने माहितीची मागणी न केल्याने तसेच रेकॉर्ड माझेकडे नसल्यामुळे मुद्या क्र.1 ची माहीती पुरविली नाही.

3. मुद्या क्र.2 व 3 चे माहिती संबंधीत रेकॉर्ड कनिष्ठ अभियंता यांचेकडे असून सदर माहिती माझ्याशी संबंधीत नाही गटविकस अधिकारी यांचे चौकशी अहवालामध्ये सदर विषयाची नस्ती व मोजमाप पुस्तीका कनिष्ठ अभियंता यांचेकडे असल्याचे नमुद केले आहे.

4. माहिती मुद्या क्र. 4 संबंधीत गावक–यांनी लोकशाहीदिनी केलेल्या तक्रारीचे संदर्भात चौकशी गटविकास अधिकारी यांनी केली त्यामुळे सदर चौकशीचे अहवाल व अहवालासंबंधी माहिती गटविकास अधिकारी यांच्या संबंधीत आहे. तसेच मुद्या क्र. 5 व 6 नुसार गटविकास अधिकारी यांना दिलेल्या माहितीच्या प्रती या संबंधी माहिती देखील अपीलकर्त्याने पं. स. स्तरावरुन उपलब्ध करुन घेता आली असती.

5 अपीलकर्ता हे गट ग्रामपंचायत खाकटा येथील रहीवाशी आहेत व माहिती संबंधीत बांधकाम ही त्यांचे गाव खाकटा येथील आहे. सदर समाज मंदिराचे बांधकाम त्यांचेकडे सोपविण्याबाबत ते माझेवर सतत दडपण आणित होते. परंतु शासन नियमानुसार सदर काम ठेकेदारी पध्दतीने करता येत नाही याची त्यांना मी जाणीव करुन दिली असता तरीही त्यांचे मार्फतच कामे केली जावी या करिता त्यांनी सुडभावनेने माझे विरुध्द खोटया तक्रारी केल्या तात्कालीन गट विकास अधिकारी यांनी देखील अकारण तक्रार वाढल्यापेक्षा सदर बांधकाम त्यांचे मार्फत करुन घेण्याचा सल्ला दिला होता परंतु सदर बाब नियमबाहय असल्याने तसेच अपीलकर्त्याचा स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेण्याशिवाय दुसरा कोणताही उद्येश नसल्याने मी त्याबाबत नकार दिला. त्यानंतर तरीही अपीलकर्त्याने जर मला बांधकाम करु दिले नाही तर मला 50,000 रुपये द्यावे लागतील नाहीतर यांचे गंभीर परिणाम तुम्हास भोगावे लागतील अशी धमकी दिली होती. सदर बांधकाम पुर्ण होवु देणार नाही व कोणत्याही पध्दतीने तुमची नोकरी गमावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही अशी धमकी दिली होती. त्यानंतर तक्रारकर्ता श्री माणिक चिंतामण गवारगुरु व त्यांचे भाउ श्री अशोक चिंतामण गवारगुरु यांनी सदर समाज मंदिर बांधकामाची व खिडक्याची तोडफोड केली त्याबाबत मी संरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी संयुक्त स्वाक्षरीने गटविकास अधिकारी पंचायत समिती तेल्हारा यांचेकडे दि. 24.4.2007 ला तक्रार दाखल केली होती व पोलिस संरक्षण मिळण्याची विनंती केली होती सदर तक्रारी नुसार गटविकास अधिकारी यांनी पत्र क्र. 449 दि. 26.4.2007 नुसार ठाणेदार पो.स्टेशन तेल्हारा यांना सदर समाज मंदीराचे बांधकाम करते वेळी पोलीस संरक्षण देण्यात यावे असे कळविले होते. परंतु त्यानंतर

अपिलकर्त्या विरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. सदर बांधकामाचे तोडफोड केल्याबाबत फोटाग्राफी काढण्यात आलेली आहे. अपीलकर्त्याच्या अशा प्रकारच्या गैरवर्तणुकीमुळे व कामकाजात अडथळयामुळे मला अकारण मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत मी अपीलकर्ता व संबंधीतासह कोणत्याही स्वरुपाची सत्यशोधन चाचणीला देखील तयार आहे.''

संक्षिप्त :– अपीलकर्त्याने माहितीचा अर्ज केल्यानंतर व दुसरी अपील दाखल करण्यापुर्वी दिनांक 22.12.2006 ला गटविकास अधिकारी यांनी गट ग्रामपंचायत उमरी येथे केलेल्या चौकशी वेळी स्वतः माझे संबंधीत मुद्या क. 1 चे माहितीची तपासणी केली होती तेव्हा सांगितल्या प्रमाणे त्यांनी माहीतीची मागणी केली असती तर माहिती देता आली असती त्याच दिवशी गट विकास अधिकारी यांनी सदर माहितीसंबंधी रेकॉर्ड ताब्यात घेतल्याने गटविकास अधिकारी यांचेकडून सुध्दा माहिती उपलब्ध करुन देता आली असती मुद्या क. 2,3,4,5 व 6 ची माहिती कनिष्ठ अभियंता व गटविकास यांच्याशी संबंधीत आहे. स्वतः अपीलकर्ता यांनी आर्थिक लाभ व्हावा या उद्येशाने गैरकृत्य केलेले आहे. त्यांची आर्थीक मागणीची पुर्तता न केल्याने त्यांनी केवळ सुड भवनेपोटी तक्रारी केल्या आहेत कामाकाजात अडथळा निर्माण केला आहे. तसेच बांधकामाची तोडफोड केली आहे. अपीलकर्त्याचे उपरोक्त गैरकृत्य लक्षात घेता मला योग्य न्याय मिळावा ही नम्र प्रार्थना.''

त्याचप्रमाणे ''<u>चौकशी अहवाल</u>'' मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि. प. अकोला यांचे पत्र क. जिप/साप्रवि/पंचा/स्था/3/1163/06 दि. 20.7.2006 चे अनुषंगाने मौजे खाकटा ग्रामपंचायत उमरी ता. तेल्हारा येथील समाज मंदिराचे बांधकामात गैरव्यवहार झाला किंवा कसे याबाबतची चौकशी दि. 4.10.2006 रोजी ठेवण्यात आली होती तथापी सचिव श्री पी.आर.चिकटे यांनी चौकशी करीता रेकॉर्ड उपलब्ध करुन न दिल्याने दि. 4.10.2006 ला चौकशी करता आली नाही. पुन्हा याच प्रकरणी चौकशी करणेकरीता दि. 22.12.2006 ला चौकशी ठेवण्यात आली चौकशीचे वेळी सचिव श्री पी.आर.चिकटे कनिष्ठ अभियंता श्री पी.आर.रणबावरे आणि तक्रारकर्ते श्री माणिक चिंतामण गवारगुरु रा. खाकटा हे उपस्थित होते.

चौकशीचे पुर्वी श्री पी.आर.रणबावरे कनिष्ठ अभियंता यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 1306 दि. 19.12.2006 देवूनसुध्दा त्यांनी दि. 22.12.2006 ला चौकशीचे वेळी सदर विषयाची नस्ती व मोजमाप पुस्तिका उपलब्ध केली नाही तसेच श्री पी.आर.चिकटे सचिव ग्रामपंचायत उमरी यांनी सुध्दा परिपुर्ण नोंदी असलेले कॅशबुक तसेच प्रमाणके उपलब्ध केली नाही. त्यामुळे सचिवाकडील यशवंत ग्राम समृध्दी योजनेचे पासबुक विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बॅक शाखा पाचगव्हाण खाते क्रमांक 2154 मध्ये असलेल्या जमा रकमा व काढण्यात आलेल्या रकमा तसेच शाखा अभियंता श्री पी.आर.रणबावरे यांनी दिनांक 20.8.2006 ला दिलेल्या अहवालावरुन चौकशी केली.

चौकशीचे वेळी ग्रामपंचायत उमरी अंतर्गत मौजे उमरी येथील समाज मंदीर तसेच मौजे खाकटा येथील समाज मंदीराचे प्रत्यक्ष पाहणी केलेल्या पाहणीत उमरी येथील समाज मंदीर पुर्ण असल्याचे तसेच मौजे खाकटा येथील समाज मंदीर स्लॅब लेव्हल पर्यंत असल्याचे दिसून आले.

सन 2002–2003 या आर्थीक वर्षात यशवंत ग्राम समृध्दी अंतर्गत ग्रामपंचायत उमरी अंतर्गत खालील कामे मंजुर आहेत.

| अ.क्र. | ग्रामपंचायत | कामाचे नाव | जमा लोकवर्गणी | मंजुर शासन निधी |
|---|---|---|---|---|
| 1 | उमरी ता तेल्हारा | 10% समाज मंदिर खाकटा येथे | 50,000 | 4,50,000 |
| 2 | उमरी ता तेल्हारा | 15% समाज मंदिर उमरी येथे | 45,000 | 2,55,000 |

श्री पी.आर.रणबावरे कनिष्ठ अभियंता यांनी दि. 20.8.2006 रोजी दिलेल्या लेखी अहवालानुसार बांधकामाकरीता खालीलप्रमाणे शासन निधी उपलब्ध करुन दिल्याचे नमुद आहे. (दि. 20.8.2006 चे अहवालाची प्रत सोबत जोडली आहे.)

अनुदान वितरण तक्ता

| अ.क. | कामाचे नाव | प्रमाणक कमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 10% समाज मंदिर खाकटा | 1 | 31.3.2003 | 2,00,000 |
| 2 | 15% समाज मंदिर उमरी | 11 | 2.9.2003 | 1,00,000 |
| 3 | 10% समाज मंदिर खाकटा | 59 | 6.1.2004 | 2,00,000 |
| | | एकुण | | 5,00,000 |

याशिवाय ग्राम पंचायतीने पंचायत समिती स्तरावर जमा केलेली लोकवर्गणी रु. 10% रु. 50,000/- आणि 15% रु. 45000/- अशी एकुण रु. 95000/- ग्राम पंचायतीला देण्यात आली आहे.

ज्याअर्थी प्रत्यक्ष पाहणीत उमरी येथील समाज मंदीर पुर्ण आढळले व खाकटा येथील अपुर्ण आढळले प्रत्यक्ष कामाची स्थिती अनुदान वितरण तक्ता लक्षात घेता मुल्यांकनाचे प्रमाणात शासन निर्णय दि. 27.8.2002 मधील निर्देशानुसार निधी वाटपाचे (40:40:20) या प्रमाणात आढळल्याचे दिसून येत नाही. या अनियमिततेस कनिष्ठ अभियंता, तत्कालीन गट विकास अधिकारी जबाबदार असल्याचे दिसून येते.

यशवंत ग्राम समृध्दी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीचे विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण बॅंक शाखा पाचगव्हाण खाते कमांक 2154 वरील उता-यावरुन ग्रामपंचायतीला खालील प्रमाणे रकमा प्राप्त झाल्याचे दिसुन येते. (दि. 24.4.2003 ते 30.11.2005)

खात्यात जमा रकमा

1. अनामत .. 1,00.00
2. प्राप्त शासकीय अनुदान .. 5,00,000.00
3. जमा रकमेवर प्राप्त व्याज .. 1,625.00
4. पंचायत समिती स्तरावर असलेली लोगवर्गणीची रकम .. 95,000,00

ग्राम पंचायतीला प्राप्त

एकुण जमा रक्कम .. 5,96,725.00

खात्यातुन काढण्यात आलेल्या व खर्च केलेल्या रकमा

| | | | |
|---|---|---|---|
| 1. समाज मंदीर उमरी व खाकटा या कामावर खर्च करण्यात आलेली रकम | .. | 5,94,000.00 |
| 2. चेक वटविणे कमीशनवर झालेला खर्च | .. | 1,665.00 |
| एकुण काढण्यात आलेल्या रकमा | | 5,95,665.00 |

ग्राम पंचायतीला मंजुर कामापैकी उमरी येथील समाज मंदीर पुर्ण असल्याने या कामावर मंजुर शासन निधी व जमा लोकवर्गणी रु. 3,00,000/– एवढया मर्यादेत खर्चाची मर्यादा असल्याने या कामावर रु. 3,00,000/– खर्च झाला असे निश्चित करण्यात येत आहे. त्यामुळे एकुण कामावर झालेला खर्च रु. 5,94,000 (–) 3,00,000 = 2,94,000 एवढा खर्च खाकटा येथील समाज मंदीरावर केल्याचे दिसून येते. कनिष्ठ अभियंता यांनी दि. 20.8.2006 रोजी सादर केलेल्या अहवालावरुन खाकटा येथील समाज मंदीराचे बांधकामाचे मुल्यांकन रु. 2,03,800/– एवढे असल्याचे दिसून येते. म्हणजेच ग्रामपंचायतीने (सरपंच व सचिव यांचे संयुक्त खात्यातून) रु. 90,200/– एवढी रक्कम जादा काढल्याचे दिसुन येते.

सदर कामावर जादा खर्च रु. 90,200/– केल्याने सदर रकम वसुल पात्र ठरते.'' असा चौकशी अहवाल दिसून येतो.

या संपूर्ण खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी सदरची मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देतांना त्यांना या सर्व प्रकरणाची माहिती होती असे दिसून येते. तसेच माहिती मागितल्या नंतर ज्या घटना घडलेल्या आहेत व जी वस्तुस्थिती समोर आलेली आहे त्याकरीताच माहिती मागितलेली दिसून येते. माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे उपाय असतांना बांधकाम चालू असतांना श्री माणिक चिंतामण गवारगुरु व श्री अशोक चिंतामण गवारगुरु यांनी केलेले बांधकाम खिडक्या तोडफोड केले बांधकामात अडथळा निर्माण केला व पैशाची मागणी

केली त्याकरीता मेहेरबान ठाणेदार साहेब यांचेकडून संरक्षण मिळावे याकरीता जो अर्ज सादर केलेला आहे त्यावरुन अपीलकर्ता यांनी केलेल्या खुलाशास पुष्टी मिळते. व त्याकरीता दि. 26.4.2007 रोजी सुध्दा ठाणेदार पोलीस स्टेशन तेल्हारा यांचेकडे गट विकास अधिकारी तेल्हारा यांनी पोलीस संरक्षण मिळण्याकरीता अर्ज पाठविलेला दिसून येतो. यावरुन हे निश्चित होते की बांधकामाच्या संदर्भामध्ये अडथळा निर्माण करण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे सदरची मागितलेली माहिती ही व्यापक जनहितार्थ दृष्टीने मागितलेली नसून स्वहितार्थाच्या दृष्टीने मागितलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती याबाबत ही तत्कालीन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा, चौकशी अहवाल व गट विकास अधिकारी यांचेकडे पोलीस संरक्षण व ठाणेदार यांचेकडे मागितलेले संरक्षण मिळण्याच्या संदर्भामध्ये मागितलेल्या अर्जाच्या छायांकित प्रतीवरुन माहिती ही स्वहिताकरीता मागितलेली होती असे दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 12.3.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.